दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 सोमवार, दि. २७ एप्रिल, २०२६ वर्ष - १ अंक - २१२ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

सोमवार दि. २७ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, एकादशी संध्याकाळी ६-१८ पर्यंत नंतर द्वादशी तिथी, दिवस नक्षत्र – पूर्वा रात्री ९-१९ पर्यंत नंतर उत्तरा चंद्र रास - सिंह रात्री ३-३६ पर्यंत, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### पुणे 'हॉट' सिटी!

**पुणे**: शहरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, शनिवारी (दि. २५) तापमानाने यंदाचा उच्चांक गाठला आहे. उष्णतेचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने पुणेकरांना उन्हाच्या झळांनी नकोसे केले आहे. आज लोहगाव परिसरात सर्वाधिक ४२.४ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. शिवाजीनगर परिसरातील पाराही ४१ अंशावर पोहचला. गेल्या काही दिवसांपासून पुण्याच्या तापमानात सातत्याने वाढ होत आहे.

## सारांश वृत्त

### अवैध शस्त्रांस्त्रांचे जाळे उद्ध्वस्त

**नवी दिल्ली :** मेरठमधील एका प्रमुख पुरवठादारासह तिघांना अटक करण्यात आली असून, दिल्ली आणि पश्चिम उत्तर प्रदेश दरम्यान कार्यरत असलेल्या एका अवैध शस्त्र पुरवठा नेटवर्कचा पर्दाफाश करण्यात आला. माहितीच्या आधारे केलेल्या कारवाईनंतर ही अटक करण्यात आली, ज्यामध्ये आरोपी कथित गुन्हा करण्यापूर्वीच त्यांना अडवण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले.

### डीआरडीओ शास्त्रज्ञावर हल्ला; गुन्हा दाखल

**डेहराडून :** डीआरडीओ शास्त्रज्ञाला मारहाण केल्याच्या आरोपावरून एका बिल्डरवर गुंडा कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला जिल्ह्यातून हद्दपार केले जाण्याची शक्यता आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हिंसाचार आणि सार्वजनिक छळात वारंवार सहभागी असल्याची स्वतःहून दखल घेतल्यानंतर जिल्हाधिकारी सविन बन्सल यांनी बिल्डर पुनीत अग्रवाल यांच्याविरुद्ध कारवाई सुरू केली, असे निवेदनात म्हटले आहे. बेकायदेशीर बांधकामामुळे त्यांच्या घरावर ढिगारा पडल्याच्या निषेधार्थ शास्त्रज्ञ अनिरुद्ध शर्मा यांनी केलेल्या आंदोलनावरून अग्रवाल यांनी त्यांना कथितरित्या मारहाण केल्याच्या अलीकडील घटनेनंतर ही कारवाई करण्यात आली आहे, असे त्यात म्हटले आहे.

### भाजप 'गुंडाराज', 'सिंडिकेट राज' संपवेल

**कोलकाता :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी सांगितले की, राज्यात सत्तेवर आल्यास भाजप पश्चिम बंगालमधील "गुंडाराज" आणि "सिंडिकेट राज" संपुष्टात आणेल. मतदारांनी विधानसभा निवडणुकीच्या पहिल्याच टप्प्यात ममता बॅनर्जी सरकारला 'सफाई' करून टाकले, असा दावा त्यांनी जाहीर सभेत केला.

### ट्रम्प बचावले; लोकशाहीच्या अभेद्य तटबंदीला 'लोन वोल्फ'चा सुरुंग!

# व्हाईट हाऊसमध्ये गोळीबाराचा थरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वॉशिंग्टन :** जगातील सर्वात सामर्थ्यवान आणि सुरक्षित मानल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या 'व्हाईट हाऊस'मध्ये सत्तेचा आणि माध्यमांचा मेळा भरलेला असतानाच, गोळीबाराच्या एका थराराने जागतिक राजकारणाची झोप उडवली आहे. निमित्त होते पारंपरिक 'व्हाईट हाऊस प्रेस करस्पॉन्डंट्स डिनर'चे, पण त्याचे रूपांतर काही क्षणांतच रणभूमीच्या दहशतीत झाले. या हल्ल्यानंतर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तातडीने प्रतिक्रिया देत, हा हल्ला म्हणजे एकाकी हल्लेखोराचा कट असल्याचे सांगत सुरक्षेच्या नव्या आव्हानांवर बोट ठेवले आहे.

दरवर्षीप्रमाणे अमेरिकेतील दिग्गज पत्रकार, राजकारणी आणि सेलिब्रिटींच्या उपस्थितीत हा सोहळा रंगला होता. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांचे भाषण आणि मिश्किल टिपण्यांची वाट जग पाहत असतानाच, अचानक गोळीबाराच्या आवाजाने शांतता भंग पावली. व्हाईट हाऊसच्या परिसरातच झालेल्या या हल्ल्यामुळे एकच पळापळ झाली. सीक्रेट सर्व्हिसच्या जवानांनी क्षणाचाही विलंब न लावता राष्ट्राध्यक्षांना संरक्षणात्मक कडे करून सुरक्षित स्थळी हलवले. लोकशाहीचे चौथे स्तंभ मानल्या जाणाऱ्या माध्यमांच्या मेळाव्यातच हा हल्ला होणे, हा केवळ सुरक्षेचा प्रश्न नसून तो लोकशाही मूल्यांवरील आघात मानला जात आहे.

घटनेनंतर काही वेळातच ट्रम्प यांनी देशाला संबोधित केले. "हा कोणताही संघटित दहशतवादी कट नसून एका विस्कळीत मानसिकतेच्या 'लोन वोल्फ'ने केलेले कृत्य आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

ट्रम्प यांच्या या विधानामुळे जागतिक सुरक्षा वर्तुळात पुन्हा एकदा 'लोन वोल्फ' हल्ल्यांच्या धोक्यावर चर्चा सुरू झाली आहे. कोणतेही नेटवर्क किंवा संघटना सोबत नसल्यामुळे अशा हल्लेखोरांचा माग काढणे गुप्तचर यंत्रणांसाठी 'कयामत' ठरत आहे. ट्रम्प यांनी या घटनेचा वापर करत आपल्या 'लॉ अँड ऑर्डर'च्या अजेंड्यावर पुन्हा एकदा भर दिला आहे.

ज्या व्हाईट हाऊसच्या सुरक्षेसाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केले जातात आणि जिथे पक्ष्यालाही शिरकाव करणे कठीण मानले जाते, तिथे एखादा हल्लेखोर शस्त्रासह पोहोचतोच कसा? हा प्रश्न आता विचारला जात आहे. प्रेस डिनरसारख्या हाय-प्रोफाईल कार्यक्रमात झालेला हा सुरक्षा भंग अमेरिकन गुप्तचर संस्थांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करणारा आहे.

येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प या घटनेला कशा प्रकारे हाताळतात, याकडे जगाचे लक्ष लागले आहे. मात्र, या एका घटनेने अमेरिकेच्या 'अजिंक्य' प्रतिमेला तडा दिला आहे, हे मात्र निश्चित.

## महाराष्ट्रासह देशभरात उष्णतेची तीव्र लाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** येत्या काही दिवसांत जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंडीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान; तसेच मध्य भारतातील तुरळक भागांत उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. किनारपट्टी आणि पूर्वेकडील भागात उष्ण व दमट हवामानाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

उत्तर भारताच्या काही भागांत रात्रीही उकाडा जाणवू शकतो. २७ एप्रिलपर्यंत वायव्य भारतातील कमाल तापमानात कोणताही लक्षणीय बदल होणार नाही. त्यानंतर तापमानात हळूहळू घट होईल; तर मध्य आणि इतर भागांत अंदाजाच्या कालावधीत तापमानात टप्प्याटप्प्याने वाढ आणि त्यानंतर घट होण्याची शक्यता आहे, असा अंदाज आहे.

महाराष्ट्रातही दिवसेंदिवस उष्णतेचे चटके तीव्र होत आहेत. खान्देशचा पारा गेल्या काही दिवसांपासून ४१ ते ४३ अंशांदरम्यान रेंगाळत आहे. जळगावचे तापमान ४३.४, नंदुरबार ४१; तर अहिल्यानगरचा पारा ४० अंशावर गेला. राज्यात शनिवारी उच्चांकी ४५.६ अंश सेल्सिअस तापमान अकोल्यात आणि सर्वांत कमी किमान तापमान २१.६ अंश सेल्सिअस महाबळेश्वरमध्ये नोंदविण्यात आले. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये पारा ४० ते ४५ अंशांच्या पुढेच नोंदवला गेल्याने राज्यभरात उष्णतेची तीव्र लाट जाणवत आहे.

## वक्तव्यावरून वाद धीरेंद्र शास्त्री यांची माफी

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्यावरून राज्यभरात निर्माण झालेल्या वादानंतर बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी अखेर माफी मागितली आहे. आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला गेला असून, ज्यांच्यापासून प्रेरणा घेतो त्या महान व्यक्तिमत्त्वाचा अवमान करण्याचा विचारही मनात येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

नागपूरमध्ये आयोजित कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांच्याबाबत केलेल्या विधानानंतर विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्यानंतर या प्रकरणाने राजकीय आणि सामाजिक वर्तुळातही मोठे रूप धारण केले. वाद वाढल्यानंतर स्पष्टीकरण देताना शास्त्री म्हणाले की, "काही लोकांनी माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला. हिंदू राष्ट्राची प्रेरणा ज्यांच्याकडून मिळते, त्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्याचा प्रश्नच नाही. उलट, या देशातील हिंदुत्व जागृत राहण्यामागे त्यांचेच मोठे योगदान आहे. शिवाजी महाराजांबद्दल बोलताना माझ्या मनात कोणताही चुकीचा हेतू नव्हता. त्यांच्या गुरुंप्रती आणि संतांप्रती असलेल्या आदरभावाबद्दल मी माझ्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा चुकीचा अर्थ लावला गेला." तसेच, "माझ्या वक्तव्यामुळे जर कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो," असेही त्यांनी स्पष्ट केले.

### रिक्षा-टॅक्सी युनियन आक्रमक; परवाने रद्दच्या निर्णयावरून आंदोलनाचे हत्यार

# मराठी सक्तीविरोधात मुंबईत पडली ठिणगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** येत्या १ मे रोजी साजरा होणाऱ्या महाराष्ट्र दिनाचे निमित्त साधत राज्य सरकारने रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, ज्या चालकांना मराठी येणार नाही, त्यांचे परवाने रद्द करण्याचा इशारा प्रशासनाने दिल्यामुळे आता मुंबईत नवा राजकीय आणि सामाजिक संघर्ष पेटला आहे. या निर्णयाविरोधात मुंबईतील रिक्षा-टॅक्सी युनियनने आक्रमक पवित्रा घेतला असून, मुंबईत एका मोठ्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य सरकारच्या नव्या नियमानुसार, १ मे पासून मुंबईसह राज्यातील सर्व रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक असेल. जर चालक मराठीत संवाद साधू शकला नाही किंवा त्याला प्राथमिक मराठी येत नसेल, तर आरटीओ कडून त्याचे लायसन्स आणि परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाऊ शकते. सरकारच्या या 'दंडुकेशाही'मुळे परप्रांतीय चालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे, तर युनियनने याला 'आर्थिक नाकेबंदी' असे संबोधले आहे.

संजय निरुपम यांचा विरोध: काँग्रेसचे माजी नेते संजय निरुपम यांनी या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. "भाषेच्या नावाखाली गरीब चालकांचा रोजगार हिरावून घेणे अन्यायकारक आहे," अशी भूमिका घेत त्यांनी युनियनच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. दुसरीकडे, शिंदे गटाचे आमदार प्रताप सरनाईक यांनी या निर्णयाचे समर्थन केले आहे. "महाराष्ट्रात राहायचे असेल आणि व्यवसाय करायचा असेल, तर मराठी आलीच पाहिजे," असे म्हणत त्यांनी सरकारची भूमिका लावून धरली आहे.

राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने नेहमीप्रमाणेच मराठीच्या मुद्द्यावर आक्रमक पवित्रा घेतला आहे. "हा नियम वर्षानुवर्षे कागदावर आहे, त्याची फक्त आता अंमलबजावणी होत आहे. यात चुकीचे काय?" असा सवाल मनसेकडून विचारला जात आहे.

मुंबईतील प्रमुख रिक्षा-टॅक्सी युनियन्सनी या निर्णयाला विरोध करण्यासाठी कंबर कसली आहे. "आम्ही मराठीच्या विरोधात नाही, पण परवाने रद्द करण्याची अट आम्हाला मान्य नाही. हा निर्णय मागे न घेतल्यास १ मे रोजी मुंबईत चक्का जाम करू," असा इशारा युनियन नेत्यांनी दिला आहे. यासंदर्भात मुंबईत लवकरच एक भव्य मेळावा आयोजित करून पुढील दिशा ठरवली जाणार आहे. येत्या काही दिवसांत हा वाद अधिक चिघळण्याची शक्यता असून, १ मे रोजी मुंबईचे रस्ते धगधगणार की सरकार माघार घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### क्यूआर कोड सक्तीचा, २७ मेपासून कारवाई

# पुण्यात बेकायदा जाहिरात फलकांवर लगाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** शहरातील बेकायदा जाहिरात फलकांवर आळा घालण्यासाठी पुणे महानगरपालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, सर्व अधिकृत जाहिरात फलकांवर क्यूआर कोड लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयाची अंमलबजावणी महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत केली जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या ९ मे २०२२ च्या जाहिरात नियंत्रण नियमावलीनुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे.

शहरात वाढत्या अनधिकृत फलकांच्या समस्येच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या नियमानुसार, प्रत्येक अधिकृत जाहिरात फलकाच्या खालच्या उजव्या कोपऱ्यात क्यूआर कोड असणे अनिवार्य असेल. हा कोड स्कॅन केल्यावर संबंधित फलकाची परवानगी, नूतनीकरण स्थिती, मालकी हक्क आणि परवान्याची मुदत याबाबतची सविस्तर माहिती नागरिकांना पाहता येणार आहे.

महापालिकेच्या या निर्णयामुळे जाहिरात क्षेत्रात पारदर्शकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अनेकदा मुदत संपलेले किंवा विनापरवाना फलक शहरात उभारले जात असल्याच्या तक्रारी येत होत्या. आता क्यूआर कोड नसलेले फलक थेट बेकायदा समजले जाणार आहेत.

अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी यासंदर्भात कडक आदेश जारी केले असून, २७ मेपासून शहरभर विशेष मोहीम राबवून कारवाई सुरू केली जाणार आहे. कारवाईत निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

या उपक्रमासाठी आवश्यक क्यूआर कोड माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध करून दिले जात असून, त्यातील माहितीमध्ये बदल करण्यासाठी महापालिकेची पूर्वपरवानगी आवश्यक राहणार आहे. या निर्णयामुळे नागरिकांनाही अधिकृत आणि अनधिकृत फलकांमधील फरक सहज ओळखता येणार आहे.

### टीएमसी कार्यकर्त्यांच्या घरातून शेकडो बॉम्ब जप्त

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या काही दिवस आधी, दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील भांगर येथे टीएमसी कार्यकर्त्यांच्या घरातून पोलिसांनी रविवारी सुमारे १०० बॉम्ब जप्त केले, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. रफिकुल इस्लाम यांच्या निवासस्थानी केलेल्या झडतीदरम्यान स्फोटके जप्त करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. पोलीस आयुक्त, सर्व डीसीपी, एसपी आणि ओसी व आयसी पदापर्यंतच्या अधिकाऱ्यांना कडक संदेश देण्यात आला असून, त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणतेही स्फोटक आढळल्यास, संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली जाणार आहे.

## 'आपली बस, आपली सेवा' अभियान

### परिवहन महामंडळाचा १ मे पासून अनोखा उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीने, नव्या शिस्तीने आणि नव्या संवेदनशीलतेने प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने 'आपली बस आपली सेवा' या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे.१ मे २०२६ पासून राज्यभर राबविण्यात येणारे हे अभियान केवळ सेवा सुधारण्याचा उपक्रम नसून, एसटी आणि प्रवासी यांच्यातील विश्वासाचा नवा सेतू ठरणार आहे. लालपरीच्या चाकांना आता केवळ वेग नाही, तर संवेदनशीलतेचीही दिशा मिळणार आहे.

'आपली बस, आपली सेवा' हा मंत्र प्रत्यक्षात उतरला, तर प्रत्येक प्रवास हा केवळ एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी जाण्याचा मार्ग न राहता—एक सुखद, सन्मानपूर्वक आणि समाधानकारक अनुभव ठरेल, असे प्रतिपादन प्रताप सरनाईक यांनी केले आहे.या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता 'सेवक' बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती; प्रवास वेगवान आणि सुरक्षित होणार

# महाराष्ट्र दिनी एक्सप्रेसवेच्या मिसिंग लिंकचे उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः 'ॲक्सेस कंट्रोल' बनवणाऱ्या महत्त्वाच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.
उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रत्यक्ष काम झाले त्या ठिकाणाला भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. "मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत," असे त्यांनी सांगितले.
सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले. मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल. "या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील," असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात हलकी वाहने आणि बसांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. टोलवाढीबाबत स्पष्ट करताना शिंदे म्हणाले की, "मिसिंग लिंक प्रकल्पामुळे टोलमध्ये कोणतीही वाढ होणार नाही. खालापूर टोल नाक्यावरही सध्या कोणतीही वाढ प्रस्तावित नाही." सुमारे ६७०० कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला २०१९ साली मंजुरी देण्यात आली होती. त्या वेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते, तर आता त्यांच्या उपस्थितीतच या प्रकल्पाचे लोकार्पण होणार असल्याने हा एक विशेष योगायोग असल्याचे त्यांनी सांगितले.

## सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात भरघोस वाढ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशभरात ८व्या वेतन आयोगाबाबत चर्चा वेग घेत असून, विविध कर्मचारी संघटनांनी केंद्र सरकारकडे वेतन, भत्ते आणि सेवाशर्तींमध्ये मोठे बदल करण्याच्या मागण्या केल्या आहेत. या मागण्या मान्य झाल्यास लाखो सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन संरचनेत मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

केंद्रशासित प्रदेशातील शिक्षकांच्या 'प्रगतिशील शिक्षक न्याय मंच' या संघटनेने किमान वेतनात लक्षणीय वाढ करण्याची मागणी केली आहे. लेवल १ कर्मचाऱ्यांचे किमान वेतन सध्याच्या पातळीवरून थेट ५० हजार ते ६० हजार रुपयांपर्यंत नेण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. महागाई, वाढता जीवनावश्यक खर्च आणि बदललेली आर्थिक परिस्थिती लक्षात घेता ही वाढ आवश्यक असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

वेतनवाढीच्या गणनेत महत्त्वाचा असलेला फिटमेंट फॅक्टरही वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या २.५७ असलेला हा फॅक्टर २.६२ ते ३.८३ दरम्यान नेण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय वार्षिक वेतनवाढ ३ टक्क्यांवरून ६ ते ७ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.

या बदलामुळे कर्मचाऱ्यांच्या एकूण पगारात लक्षणीय वाढ होऊ शकते. उच्च पदांसाठीही मोठ्या वेतनवाढीची मागणी पुढे आली आहे.

## संपादकीय

# बीजिंगची इराण-नीती आणि दुहेरी पेच




**पश्चिम आशियाच्या धगधगत्या कुंडात हात घालताना चीनला आता आपल्या धोरणात्मक मर्यादांची जाणीव होऊ लागली आहे. इराणशी असलेली जवळीक आणि अरब देशांशी राखलेला समतोल यातील विसंवाद बीजिंगच्या 'जागतिक मध्यस्थ' या प्रतिमेलाच तडे देणारा ठरत आहे.**

जागतिक राजकारणाच्या पटावर 'मध्यस्थ' म्हणून मिरवण्याची हौस चीनला अलीकडच्या काळात सुटली आहे. सौदी अरेबिया आणि इराण यांच्यात 'ऐतिहासिक' समेट घडवून आणल्यानंतर, ड्रॅगनला वाटले होते की आपण पश्चिम आशियातील अमेरिकेची जागा सहज व्यापू शकू. मात्र, भू-राजकारण हे केवळ चहाच्या टेबलावर चर्चा करण्याइतके सोपे नसते, याची प्रचिती चीनला आता येऊ लागली आहे. चीन सध्या इराणच्या मुद्द्यावर अशा एका चक्रव्यूहात अडकला आहे, जिथून बाहेर पडणे त्याला धोरणात्मकदृष्ट्या जड जात आहे. चीनला इराणचे तेलही हवे आहे आणि अरब देशांची गुंतवणूकही; पण या दोन परस्परविरोधी टोकांना एकत्र बांधताना ड्रॅगनच्या मुत्सद्देगिरीला आता घाम फुटू लागला आहे. इराण आणि चीन यांच्यातील संबंध हे प्रामुख्याने 'गरजेपोटी निर्माण झालेली मैत्री' या व्याख्येत बसतात. अमेरिकेच्या निर्बंधांनी होरपळलेल्या इराणला चीन हा एक मोठा आर्थिक आधार वाटतो, तर चीनला इराणच्या रूपाने एक हक्काचा ऊर्जेचा स्रोत आणि अमेरिकेला शह देणारा एक मोहरा मिळाला आहे. पण ही मैत्री जेव्हा इस्त्रायल-इराण संघर्षाच्या रणांगणावर येते, तेव्हा चीनची स्थिती 'इकडे आड तिकडे विहीर' अशी होते. चीनने इराणशी २५ वर्षांचा धोरणात्मक करार तर केला, पण जेव्हा इराणला लष्करी किंवा उघड राजनैतिक समर्थनाची गरज असते, तेव्हा बीजिंग सोयीस्कर मौन बाळगते. हे मौन म्हणजे मुत्सद्देगिरी नसून, ती चीनच्या मर्यादांचे प्रदर्शन आहे. चीनचा खरा पेच आहे तो त्यांच्या 'अरब' हितसंबंधांचा. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतार यांसारख्या देशांशी चीनचे आर्थिक संबंध इराणपेक्षा कितीतरी पटीने मोठे आहेत. हे देश इराणच्या प्रादेशिक विस्ताराला आणि त्यांच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला आपला शत्रू मानतात. अशा स्थितीत, जर चीनने इराणची बाजू अधिक उघडपणे घेतली, तर अरब देशांमधील त्यांच्या अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणुकीला धोका निर्माण होऊ शकतो. इराणला डावलणे चीनला परवडणारे नाही, कारण इराण हा चीनच्या 'बेल्ट अँड रोड' उपक्रमातील एक महत्त्वाचा दुवा आहे. बीजिंगसाठी हा निव्वळ 'व्यापारी' प्रश्न नसून, तो त्यांच्या जागतिक प्रतिमेचा प्रश्न आहे. चीन इराणला नियंत्रित करू शकत नसेल, तर त्यांच्या मध्यस्थीला जागतिक पटलावर शून्य किंमत उरते. चीन हा असा खेळाडू आहे ज्याला 'क्रेडिट' (श्रेय) सर्व हवे असते, पण 'रिस्क' (धोका) मात्र शून्य घ्यायची असते. पण जागतिक सत्तेचे राजकारण अशा सुरक्षित अंतरावरून खेळता येत नाही. या सर्व घडामोडींचा भारतावर होणारा परिणाम महत्त्वाचा आहे. भारताने चाबहार बंदराच्या माध्यमातून इराणशी आपले संबंध जिवंत ठेवले आहेत. चीनचा इराणमधील वाढता हस्तक्षेप हा भारतासाठी चिंतेचा विषय असला तरी, आता चीनलाच तिथे ज्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे, त्यातून भारतासाठी काही संधी निर्माण होऊ शकतात. भारत हा पश्चिम आशियात 'तटस्थ' राहण्याऐवजी 'समतोल' राखण्यात अधिक यशस्वी ठरला आहे, कारण आपली धोरणे ही केवळ व्यापारावर नाही तर ऐतिहासिक संबंधांवर आधारलेली आहेत. चीनच्या या 'इराण गोंधळा'मागे त्यांचे अमेरिकेसोबतचे संबंधही कारणीभूत आहेत. ट्रम्प यांच्या संभाव्य पुनरागमनामुळे चीनला आता आपल्या इराण-नीतीचा फेरविचार करावा लागत आहे. अमेरिकेने इराणवर अधिक कडक निर्बंध लादले, तर चीनच्या इराणमधील गुंतवणुकीचे काय होणार? आणि जर चीनने ते निर्बंध धुडकावले, तर त्यांच्या अमेरिकेसोबतच्या व्यापाराला किती फटका बसेल? चीनला वाटले होते की आपण आपल्या 'चेकबुक'च्या जोरावर इथली समीकरणे बदलू शकू. पण इथली संस्कृती, धर्म आणि जुनी वैरे ही डॉलर किंवा युआनपेक्षा अधिक शक्तिशाली आहेत. इराणचा पेच सुटण्याऐवजी तो अधिक गुंतागुंतीचा होत चालला आहे, आणि ड्रॅगनची 'अजिंक्य' असण्याची प्रतिमा या वाळूच्या वादळात धूसर होत आहे. बीजिंगला आता हे समजून घ्यावे लागेल की, केवळ इमारती बांधून आणि तेल विकत घेऊन जागतिक नेता होता येत नाही; त्यासाठी जबाबदारी स्वीकारण्याची आणि प्रसंगी किंमत मोजण्याची तयारी असावी लागते. इराणच्या या चक्रव्यूहात ड्रॅगन जसा अडकला आहे, तसाच तो जागतिक राजकारणाच्या 'विद्रूप' वास्तवाचा बळीही ठरत आहे. ज्या चीनने जगाला 'विन्-विन्' चा नारा दिला, त्यांना आता या पश्चिम आशियाई दलदलीत 'लूज-लूज' परिस्थितीचा सामना करावा लागतोय, हाच काळाचा मोठा काव्यगत न्याय आहे.

# रुपयाचा 'अस्मिता'वाद आणि वास्तवाचे चटके

**» अर्थकारणाच्या महासागरात रुपयाचे मूल्य स्थिर ठेवण्यासाठी आरबीआयची धडपड सुरू असली, तरी 'अस्मिता' आणि 'व्यावहारिकता' यातील दरी रुंदावत आहे. जागतिक वास्तवाचे भान ठेवणे म्हणूनच अनिवार्य आहे.**

जागतिक चलनांच्या बाजारपेठेत सध्या जे काही सुरू आहे, तो केवळ डॉलरच्या वर्चस्वाचा खेळ नाही, तर तो बदलत्या भू-राजकीय समीकरणांचा एक गुंतागुंतीचा परिपाक आहे. भारतीय रुपयाची घसरण जेव्हा जेव्हा होते, तेव्हा तेव्हा आपल्याकडे दोन प्रकारचे गट सक्रिय होतात. एक गट जो रुपयाच्या घसरणीला 'राष्ट्रीय अपमान' मानतो आणि दुसरा जो याकडे केवळ 'मागणी आणि पुरवठ्याचे' गणित म्हणून पाहतो. रुपयाच्या या द्वंद्वावर म्हणजेच अभिमान विरुद्ध व्यावहारिकता याकडे पाहिल्यास भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढची आव्हाने स्पष्ट होतात. रुपयाच्या मूल्यात देशाची 'अस्मिता' शोधणे हे राजकीयदृष्ट्या सोयीचे असले, तरी आर्थिकदृष्ट्या ते तितकेच धोकादायक ठरू शकते.



भारतीय रुपया सध्या ज्या वळणावर उभा आहे, तिथे रिझर्व्ह बँकेला मोठी कसरत करावी लागत आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाला सावरण्यासाठी परकीय चलन साठ्याचा वापर करणे, हे तहान लागल्यावर विहीर खोदण्यासारखे आहे. डॉलर जेव्हा ताकदवान होतो, तेव्हा केवळ रुपयाच नाही तर जगातील इतर महत्त्वाची चलनेही लटपटतात. पण आपल्याकडे अडचण अशी आहे की, रुपयाचे मूल्य हे आपल्या 'विकासाचे' मोजमाप मानले जाऊ लागले आहे. प्रत्यक्षात, जागतिक व्यापारात टिकून राहण्यासाठी रुपयाचे मूल्य हे बाजारपेठेच्या वास्तवाशी सुसंगत असणे गरजेचे असते. जर रुपया कृत्रिमरित्या फुगवून ठेवला, तर त्याचा थेट फटका आपल्या निर्यातीला बसतो. अशा वेळी 'अभिमान' जपायचा की 'निर्यात' वाढवायची, हा प्रश्न धोरणकर्त्यांसमोर उभा ठाकतो.

अमेरिकेतील फेडरल रिझर्व्हने व्याजाचे दर वाढवण्याचा घेतलेला पवित्रा आणि जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी अनपेक्षित चढ-उतार, हे रुपयाच्या घसरणीचे मुख्य सूत्रधार आहेत. त्यातच, विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून काढता पाय घेण्याचा जो सपाटा लावला आहे, त्यामुळे रुपयावरचा दबाव अधिकच वाढला आहे. येथे कळीचा मुद्दा असा की, आपण 'रुपयाचे आंतरराष्ट्रीयकरण' करण्याच्या गप्पा मारत असताना, जागतिक गुंतवणूकदारांचा रुपयावरचा विश्वास आपण किती कमावला आहे? रुपयाला स्थिर दाखवून अर्थव्यवस्था सावरता येत नाही. त्यासाठी देशातील उत्पादकता आणि व्यापारातील तूट कमी करणे आवश्यक असते.

खरे तर, रुपयाच्या घसरणीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन हा 'शॉर्ट-टर्म' (अल्पकालीन) आहे. जेव्हा रुपया घसरतो, तेव्हा पेट्रोल-डिझेल महागणार आणि महागाई वाढणार ही भीती रास्त आहे. पण त्याच वेळी, घसरलेला रुपया हा भारतीय माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र आणि औषध उद्योगासाठी एक संधीही घेऊन येतो. मात्र, या फायद्यांपेक्षा घसरणीचा 'इमेज'ला लागणारा धक्का हा सत्ताधाऱ्यांसाठी अधिक चिंतेचा विषय ठरतो. अर्थशास्त्रात 'भावने'पेक्षा 'व्यावहारिकता' महत्त्वाची असते, हे आपण विसरतो.

येथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, चीनने आपल्या चलनाच्या (युआन) बाबतीत नेहमीच 'प्रॅक्टिकॅलिटी' पाळली आहे. त्यांनी निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या चलनाला मुद्दाम कमकुवत ठेवले. आपण मात्र रुपयाच्या मुल्यात 'महारथी' होण्याचे स्वप्न पाहतो आहोत. जागतिक मंदीची सावली गहिरी होत असताना, भारताने आपली चलनविषयक धोरणे अधिक लवचिक ठेवणे गरजेचे आहे. केवळ परकीय चलन साठा खर्च करून रुपया सावरणे हे म्हणजे फुटक्या बादलीत पाणी भरण्यासारखे आहे. आपल्या अर्थव्यवस्थेचे मूळ आधार स्तंभ मजबूत होत नाहीत, तोपर्यंत रुपयाची घसरण थांबणार नाही.

रुपयाची किंमत ही मंत्रालयातील दालनात ठरत नाही, ती जागतिक व्यापाराच्या रानात ठरते. आपल्याला जर रुपयाची ताकद वाढवायची असेल, तर केवळ 'डिजिटल पेमेंट' किंवा 'रुपयातील व्यापार' करून चालणार नाही. त्यासाठी जागतिक बाजारपेठेला हव्या असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन भारतात होणे गरजेचे आहे. जेव्हा जग भारतीय रुपयासाठी रांगा लावेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने रुपयाचा 'प्राईड' सिद्ध होईल. तोपर्यंत, रुपयाच्या घसरणीवर केवळ मलमपट्टी करून किंवा भावनिक राजकारण करून आपण केवळ स्वतःचीच फसवणूक करत आहोत.

रुपयाचे हे द्वंद्व येणाऱ्या काळात अधिक तीव्र होणार आहे. रुपयाला संतुलित ठेवणे हे आरबीआयच्या गव्हर्नरांसाठी आणि अर्थमंत्र्यांसाठी एक मोठी अग्निपरीक्षा आहे. व्यावहारिकता बाजूला ठेवून केवळ 'प्राईड'च्या मागे धावल्यास, आपण जागतिक अर्थकारणाच्या शर्यतीत मागे पडू शकतो. रुपयाला आता केवळ घोषणांची नाही, तर ठोस आर्थिक सुधारणांची जोड हवी आहे. अन्यथा, रुपयाची ही 'दिलासादायक' वाटचाल केवळ कागदावरच राहील आणि सर्वसामान्यांच्या खिशाला लागणारी गळती मात्र सुरूच राहील.

# जनगणना प्रक्रिया अचूक व सुलभ राबवा

## प्रशिक्षण कार्यपद्धतीचा घेतला सविस्तर आढावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनगणना मोहिमेला वेग आला असून, प्रशिक्षण प्रक्रियेला गती मिळत आहे. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी आकुर्डी येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात सुरू असलेल्या प्रशिक्षण सत्राला भेट देत प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रशिक्षणाची प्रत्यक्ष पाहणी करत संपूर्ण कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेतला.



या भेटीदरम्यान उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार, सहायक आयुक्त किरणकुमार मोरे, चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे आदी उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती घेत जंगम यांनी प्रशिक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या.

जनगणनेतील प्रत्येक टप्पा अचूक आणि सुलभ पद्धतीने पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक कौशल्य देण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. घरगुती सर्वेक्षण, माहिती संकलनातील काटेकोरपणा, नागरिकांशी संवाद कौशल्य आणि डिजिटल साधनांचा वापर यांसारख्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. ॲप-आधारित डेटा नोंदणी आणि पडताळणी प्रक्रियेमुळे काम अधिक पारदर्शक आणि सुलभ होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या प्रशिक्षणामुळे प्रगणक व पर्यवेक्षक अधिक सक्षम होत असून आगामी जनगणनेसाठीची तयारी बळकट होत आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अचूक लोकसंख्येची माहिती उपलब्ध होण्यासाठी या मोहिमेचा महत्त्वपूर्ण वाटा असणार आहे. जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान पार पडणार असून, त्याअंतर्गत विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तीन दिवसीय प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची बारणे यांच्याकडून पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला (एसटीपी) भेट देत कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान बारणे यांनी प्रकल्पाच्या कार्यप्रणालीची सखोल माहिती घेतली. सांडपाण्याचे शुद्धीकरण कोणत्या टप्प्यांवर केले जाते, तसेच प्रक्रिया केलेल्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर कशा प्रकारे करता येईल, याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. शहरातील जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे त्यांनी परीक्षण करत आवश्यक त्या सूचनाही दिल्या. पर्यावरणाचे संरक्षण करताना उपलब्ध जलस्रोतांचा पुनर्वापर करून नैसर्गिक साधनसंपत्तीवरील ताण कमी करणे, हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश असल्याचे तसेच नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शहराचा झपाट्याने होणारा विस्तार लक्षात घेता, भविष्यात सांडपाणी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# जनगणना प्रशिक्षण केंद्रास पालिका आयुक्तांची भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनगणना मोहिमेला वेग आला असून, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २६ मधील कै. मारुती गेनू कस्पटे प्राथमिक शाळा येथे सुरू असलेल्या प्रशिक्षण केंद्राला भेट देत प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.

या वेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार तसेच चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे उपस्थित होते. आयुक्तांनी प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती घेत प्रशिक्षणाची गुणवत्ता, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त केले. जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, घरगुती सर्वेक्षणाची पद्धत, अचूक माहिती संकलन आणि नागरिकांशी प्रभावी संवाद यावर विशेष भर दिला जात असल्याचे त्यांनी पाहिले. तसेच डिजिटल साधनांचा वापर, ॲप-आधारित डेटा नोंदणी आणि माहिती पडताळणी प्रक्रियेमुळे जनगणना अधिक सुलभ व पारदर्शक होत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. जनगणना प्रक्रिया वेळेत, अचूक आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# आमदार चषक व्हॉलीबॉल स्पर्धेला उत्साहात सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडेलाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. खेळामुळे नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित होतो, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने नियमितपणे क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

निगडी येथील ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयात ग्रामीण खेळाडू विकास प्रकल्प व आमदार उमा खापरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'आमदार चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप २०२६' स्पर्धेचे उद्‌घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास विधानपरिषद सदस्या आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिकेच्या कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, नगरसदस्य अमित गावडे, ज्ञानप्रबोधिनी निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. मनोज देवळेकर, जयदीप खापरे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, क्रीडाप्रेमी व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर लांडगे म्हणाले की, शैक्षणिक प्रगतीसोबत शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि शिस्त यासाठी विद्यार्थ्यांनी खेळात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळते आणि त्यातूनच भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडतात.

स्पर्धेच्या उद्‌घाटनावेळी खेळाडू व प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना आपली क्षमता सादर करण्याची संधी मिळत असून युवकांमध्ये क्रीडाविषयी आकर्षण वाढण्यास मदत होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# विश्वासू चालकाचाच विश्वासघात; १५ लाखांचे दागिने लंपास

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुणे शहरात विश्वासाला तडा देणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. घरातील विश्वासू समजल्या जाणाऱ्या चालकानेच मालकाच्या आईचे मौल्यवान सोन्याचे दागिने चोरी केल्याचा प्रकार समोर आला असून, विमानतळ पोलिसांनी तत्पर कारवाई करत सुमारे १५ लाख रुपयांचे सोने हस्तगत केले आहे.

राजेश परशुराम कांबळे (वय ४०, रा. कलवड वस्ती, लोहगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी फारुख अब्दुल हमीद हमदुले (वय ५७, रा. कोणार्क कॅम्पस, विमाननगर) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० एप्रिल रोजी फिर्यादींनी घरातील आईचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची तक्रार नोंदवली होती. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाची सूत्रे वेगाने हलवली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड यांच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी, घरातील व्यक्तींची हालचाल तसेच सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान संशय घरातीलच चालकावर गेला आणि पोलिसांनी सापळा रचत आरोपीला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपी सुरुवातीला टाळाटाळ करत होता. मात्र, पोलिसांनी सादर केलेल्या पुराव्यांमुळे त्याने अखेर गुन्ह्याची कबुली दिली. चोरी केलेले दागिने वितळवून सोन्याची लगड तयार करून पुरावे नष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केल्याचे उघड झाले. पोलिसांनी ही लगड जप्त करून सुमारे १५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त नुतन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद शेळके, पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड व त्यांच्या पथकाने केली आहे.

**तलवारीचे स्टेटस ठेवणारा अटकेत**

**पुणे :** सोशल मीडियाच्या माध्यमातून दहशत निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध पुणे शहर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, या मोहिमेंतर्गत एकाला अटक करण्यात आली आहे. इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर तलवारीचे स्टेटस ठेवून नागरिकांमध्ये भीती पसरवणाऱ्या अक्षय विकास कांबळे (वय २७) याला गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने शनिवारी बेड्या ठोकल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखा युनिट-२ चे कर्मचारी विशाल दळवी, ओंकार कुंभार आणि ऋषीकेश व्यवहारे हे वानवडी आणि रामटेकडी परिसरात गस्त घालत होते. यावेळी पोलीस हवालदार विशाल दळवी आणि पोलीस शिपाई ऋषीकेश व्यवहारे यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक तरुण हातात तलवार घेऊन रामटेकडी येथील प्रथमा बिल्डिंगच्या पार्किंगमधील पत्राशेडमध्ये थांबला आहे. तसेच त्याने तलवारीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर स्टेटस म्हणून ठेवले होते. माहितीची खात्री पटताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी छापा टाकला. या। अक्षय कांबळे (रा. शांतीनगर, रामटेकडी, पुणे) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या अंगझडतीत लोखंडी तलवार जप्त करण्यात आली. आरोपीविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४ (२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) आणि १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली. ही कारवाई सहायक पोलीस आयुक्त शैलेश संखे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, सहायक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, साधना ताम्हाणे यांच्यासह गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली.

# ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं : डॉ. महेश भागवत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** स्पर्धा परीक्षांची तयारी करताना चालू घडामोडींची सखोल माहिती ठेवण्यासाठी दररोज वृत्तपत्र वाचन आवश्यक आहे. शैक्षणिक अभ्यासासोबतच अवांतर वाचनही सातत्याने सुरू ठेवले पाहिजे. ज्ञानाला कोणत्याही भाषेचे बंधन नसते, तसेच अपयश आल्यास पर्यायी योजना (प्लॅन बी) तयार असणे गरजेचे आहे, असे मार्गदर्शन तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. महेश भागवत यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शितल कुमार रवंदळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गिरीश देसाई यांनी केले, तर सूत्रसंचालन माधुरी ढमाले यांनी केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### अवैध मटका-जुगार अड्ड्यावर छापा

**लोणी काळभोर :** लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील थेऊर फाटा येथील नयन बारजवळ सुरू असलेल्या अवैध मटका व जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत सात जणांना रंगेहात पकडण्यात आले असून रोख रक्कम, मोबाईल व मोटारसायकली असा एकूण २ लाख ६७ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जुगार घेणारे सुजित हरी बोडके व करण सुरेश काळे यांच्यासह जुगार खेळणारे विशाल गुंडाप्पा वाघमारे, सतीश दिलीप चौडकर, बंटी शंकर गायकवाड, मंदार सोपान हगवणे व शिवाजी बारकु चव्हाण यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करीत आहेत.

CRIME NEWS

### लोणी घरफोडीचा प्रयत्न उधळला

**उरुळी कांचन :** घरी कोणी नसल्याची संधी साधून बंद सदनिकेचे कुलूप हातोड्याने तोडून चोरी करणाऱ्या दोन तरुणांना उरुळी कांचन पोलिसांनी काही तासांत अटक केली. ही घटना शनिवारी (दि. २५) दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील आश्रम रोड परिसरातील 'राज हाईट्स' अपार्टमेंटमध्ये घडली. अनिरुद्ध राजेंद्र चौधरी (वय २१, रा. धनगरवस्ती, सोरतापवाडी, ता. हवेली) व यश सुहास खेडेकर (वय २१, रा. आश्रम रोड, उरुळी कांचन, ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्या दोन्ही संशयितांची नावे आहेत. या प्रकरणी भाग्यश्री नितीनकुमार गुरख (वय ३६, व्यवसाय : शिक्षक, रा. आश्रम रोड, राज हाईट्स अपार्टमेंट, फ्लॅट क्र. २०४, उरुळी कांचन, ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## आ. बाबाजी काळे यांचा विरोधकांवर हल्लाबोल

# जनतेच्या कामांसाठी मंत्र्यांकडे जाणे गैर नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरूनगर :** "मी विरोधी पक्षाचा आमदार असलो तरी सरकार हे जनतेचे आहे. तालुक्याच्या विकासासाठी कोणत्याही मंत्र्यांकडे जावे लागले तरी जाईन; त्यात मला अजिबात कमीपणा वाटत नाही. माझे पद संविधानिक आहे आणि मी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाशी बांधील आहे," असे सांगत खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली.

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात शनिवारी (दि. २४) आयोजित सर्वपक्षीय पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्यावर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. "माझ्याविषयी नकारात्मक वातावरण तयार करण्याचा त्यांचा प्रयत्न खोटा आहे. त्यांची कर्मे त्यांना भोगावी लागतील. नजिकच्या काळात ते जेलमध्ये असतील," अशी टीका त्यांनी केली.

"काही जण केवळ गप्पा मारून पैसे कमावतात आणि मी करत असलेल्या विकासकामांमध्ये अडथळे निर्माण करतात. पण मी काम करणारा माणूस आहे, बोलणारा नाही," अशी टिप्पणीही त्यांनी केली. जलजीवन मिशनपासून पाणी योजनांपर्यंत प्रत्येक कामासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला असून त्याचे पुरावे, बैठकींचे नोंदवही आणि छायाचित्रे आपल्या कडे असल्याचे त्यांनी सांगितले.

"माझ्या ज्ञानावर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी आधी १५ वर्षे सत्तेत असताना स्वतःची कामगिरी दाखवावी," असा टोला त्यांनी लगावला. "माझ्यावर टीका करा, भ्रष्टाचारावर बोला; पण जनतेच्या कामात अडथळे आणू नका," असा इशाराही त्यांनी दिला. काही जण बिनबुडाचे आरोप करून तालुक्यातील जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. "मला ५२ हजार मताधिक्य मिळाले आहे; त्यामुळे जनता तुमच्या पाठीशी उरलेली नाही," असेही ते म्हणाले. विकासकामांचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, भीमा-भामा नदीवरील बंधाऱ्यांसाठी सुमारे ३८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून कामे सुरू झाली आहेत. तसेच पाणीपुरवठा, शेती व रस्ते विकासासाठी कोट्यवधी रुपयांच्या योजना मार्गी लागल्या आहेत. चाकण–तळेगाव–शिक्रापूर रस्त्यासाठी सुमारे ३३०० कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झाल्याचा उल्लेख करत "ही कामे कागदावर नसून प्रत्यक्ष सुरू होत आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले.

"मी राजकारण करत नाही; जनतेची सेवा करतो. कोणत्याही पक्षाचा मंत्री असो, कामासाठी त्यांच्याकडे जाणे हे माझे कर्तव्य आहे," असे सांगत त्यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. "कितीही टीका झाली तरी विकास थांबणार नाही," असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

## जुन्नरचे नायब तहसीलदार अनंता गवारी यांचा अपघाती मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतुर :** बनकर फाटा–जुन्नर मार्गावर गणपती फाट्याजवळील वळणावर हायवा आणि कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात जुन्नरचे निवडणूक नायब तहसीलदार अनंता गवारी यांचा मृत्यू झाला असून कारमधील इतर दोन महसूल कर्मचारी जखमी झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

हा अपघात शनिवारी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास पांगरी माथ्याजवळील वळणावर घडला. या अपघातात अनंता बनाजी गवारी (वय ५३) हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी ओतूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र गंभीर दुखापतीमुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. विजय खार्तोडे (वय ४७) हे गंभीर जखमी झाले असून तुषार भीमराव कोरडे (वय ३५, रा. जुन्नर) हे किरकोळ जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महसूल अधिकाऱ्यांची होंडा सिटी कार (एमएच १४ केक्यू ०८१२) बनकर फाट्याकडून जुन्नरच्या दिशेने जात होती. त्याच वेळी पांगरी माथ्याकडून बनकर फाट्याकडे येणाऱ्या हायवाशी वळणावर समोरासमोर धडक झाली. या धडकेत कारमधील गवारी व खार्तोडे गंभीर जखमी झाले, तर कोरडे यांना किरकोळ दुखापत झाली. धडक इतकी भीषण होती की कारचे तोंड फिरून विरुद्ध दिशेला वळले. अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी किशोर बर्डे व इतर पथक घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले. तसेच अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## ओतूरमध्ये वाढत्या गुन्हेगारीला लगाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत (ता. जुन्नर) वाढत्या चोरीच्या घटना व इतर गुन्हेगारी प्रकारांच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रामीण पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या संकल्पनेतून पुणे ग्रामीण हद्दीत १० हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर ओतूर पोलिसांनी सर्व पोलीस पाटील, ग्रामपंचायत प्रशासन व नागरिकांना स्पष्ट सूचना दिल्या असून, सीसीटीव्ही यंत्रणेबाबत कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचा इशारा दिला आहे. ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी यासंदर्भात पत्राद्वारे निर्देश जारी केले आहेत. पोलीस तपासात वारंवार असे आढळून आले आहे की, अनेक दुकाने, घरे, हॉटेल्स, बँका, ज्वेलर्स व पतसंस्थांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असले तरी त्यांचा वापर अत्यंत अपुरा व निष्काळजी पद्धतीने होत आहे. बहुतांश कॅमेरे केवळ आतील भागावर केंद्रित असल्याने बाहेरील रस्त्यावरील हालचालींची नोंद होत नाही. तसेच अनेक ठिकाणी डेटा केवळ २ ते ३ दिवसांपुरताच साठवला जातो. कॅमेरे व डीव्हीआर यंत्रणा कार्यरत आहे की नाही, याचीही नियमित तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या त्रुटींमुळे गुन्हे घडल्यानंतर तपासात मोठे अडथळे निर्माण होत असून गुन्हेगारांचा शोध घेण्यात विलंब होत आहे. प्रत्येक घर, दुकान व आस्थापनाबाहेर सार्वजनिक रस्ता स्पष्टपणे कॅमेऱ्यात दिसेल, अशी व्यवस्था करणे बंधनकारक आहे. उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक आहे. अधिक कालावधीसाठी डेटा साठवणूक सुनिश्चित करणे आवश्यक आहे. कॅमेरे व डीव्हीआर यंत्रणेची नियमित तपासणी करून ती सतत कार्यरत ठेवणे अनिवार्य आहे. या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

"गुन्हे रोखण्यासाठी केवळ पोलीस यंत्रणा पुरेशी नाही, तर नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. सीसीटीव्ही ही केवळ औपचारिकता नसून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रभावी साधन आहे," असे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी नमूद केले. पोलिसांच्या या कडक भूमिकेमुळे परिसरात शिस्त व सजगता वाढून गुन्हेगारीवर प्रभावी आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## पालखी महामार्गावर टोलवसुली सुरू

### स्थानिक नागरिकांकडून मोठ्या आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**जेजुरी :** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने आळंदी ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ विकसित करण्यात येत असून या मार्गावर बेलसर फाट्याजवळ टोल नाका सुरू करण्यात आला आहे. या टोलचा भार पुरंदर तालुक्यातील नागरिकांवर पडणार असून वारकरी बांधव व खंडोबा भक्तांनाही त्याचा फटका बसणार आहे.

दरम्यान, या टोल नाक्यावर शुक्रवार (दि. २४) पासून वसुली सुरू झाली आहे. निरा, वाल्हे, जेजुरी, सासवड तसेच नाझरे, कोथळे, रानमळा, साकुर्डे, बेलसर, तक्रारवाडी, भोंगळेमळा, वाळुंज, नीलुंज, शिवरी आदी गावांतील नागरिकांनी स्थानिकांकडून टोल आकारू नये, अशी मागणी केली आहे. या संदर्भात मंगळवार (दि. २८) रोजी निर्णय होणार असल्याचे सांगण्यात आले असून तोपर्यंत तोडगा न निघाल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे. महामार्ग विकसित करताना जेजुरी शहरातील सुमारे दीडशे मालमत्तांचे अधिग्रहण करण्यात आले. शहरातून मार्ग नेण्यास स्थानिकांचा विरोध होता व बाह्यवळणाची मागणी करण्यात आली होती; मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या प्रकल्पासाठी अनेक घरे, दुकाने व शेतीचे संपादन झाले असून अनेकांचे उदरनिर्वाहाचे साधनही हिरावले गेले आहे.

दिवे घाटात रस्त्याचे काम सुरू असताना टोलवसुली सुरू करण्याची घाई का, असा सवाल टोलविरोधकांनी उपस्थित केला आहे. सासवड, जेजुरी, निरा, वाल्हे येथील शेतकरी दररोज शेतीमाल विक्रीसाठी ये-जा करतात. तसेच जेजुरी एमआयडीसीतील कामगार व उद्योजक यांनाही या टोलचा फटका बसणार आहे. पुरंदर तालुक्यातील सर्व गावांतील स्थानिक वाहनांना टोलमधून सूट द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. नव्याने सुरू झालेल्या टोल नाक्यावर शुल्काचे फलक लावण्यात आले असून चारचाकी व मोठ्या वाहनांसाठी एकेरी प्रवासासाठी १०५ ते ६६५ रुपये, तर परतीसाठी १५५ ते १००० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. तसेच वीस किलोमीटर परिसरातील वाहनांसाठी सुमारे साडेतीनशे रुपयांचा मासिक पास ठेवण्यात आला आहे.

## आंबेगावच्या पूर्व भागात पाणीटंचाई



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम शेती पिकांवर होत आहे. विशेषतः चारा पिकांसह उन्हाळी भुईमूग व उन्हाळी बाजरी या पिकांना मोठा फटका बसत आहे. ही पिके अंतिम टप्प्यात असताना पाण्याचा तुटवडा भासू लागल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून उष्णतेचे प्रमाण वाढल्याने उपलब्ध पाणीसाठ्यांमध्ये झपाट्याने घट झाली आहे. त्यामुळे शेतीसाठी पाणी मिळवणे कठीण झाले आहे. परिणामी पिके वाचवण्यासाठी शेतकरी बोरवेलचा पर्याय स्वीकारताना दिसत आहेत. रांजणी परिसरात अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात बोरवेल घेण्यास सुरुवात केली आहे.

सध्या बोरवेल व्यावसायिकांकडून फुटामागे सुमारे ७० रुपये आकारले जात आहेत. अनेक ठिकाणी पाणी मिळवण्यासाठी ३०० ते ५०० फूट खोल जावे लागत असल्याने बोरवेलसाठी लाखो रुपयांचा खर्च येत आहे. तरीही अनेक वेळा बोरवेल निष्फळ ठरत असल्याने शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने बोरवेल घ्यावा लागत आहे.

या परिस्थितीत पाणी मिळवण्यासाठी शेतकऱ्यांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढत असून आर्थिक ताणही वाढत आहे. एकीकडे पिके वाचवण्याची धडपड आणि दुसरीकडे वाढता खर्च यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

## सायकलवारीतून आरोग्याचा संदेश
## विठ्ठल ढोबळे पंढरपूरकडे रवाना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथील माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी निरोगी जीवनाचा संदेश देत पुन्हा एकदा सायकलवारीचा संकल्प हाती घेतला आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे नियमित व्यायाम करणे अनेकांना शक्य होत नसताना, सायकल चालवणे हा उत्तम आणि सर्वांगिण व्यायाम असल्याचे सांगत त्यांनी ही प्रेरणादायी मोहीम सुरू केली आहे.

शुक्रवारी (दि. २४) पहाटे गावातील सर्व ग्रामदैवतांच्या चरणी मस्तक ठेवून विठ्ठल ढोबळे यांनी भरत ढोबळे, गणेश ढोबळे, अशोक ढोबळे या सहकाऱ्यांसह पंढरपूरकडे सायकलवारीला सुरुवात केली. प्रारंभी त्यांनी श्री क्षेत्र आळंदी येथे जाऊन माऊलींचे दर्शन घेतले. त्यानंतर दिवे घाट, सासवड या



पालखी मार्गाने ते श्री क्षेत्र पंढरपूरकडे रवाना झाले. यापूर्वीही विठ्ठल ढोबळे यांनी दोन वेळा पंढरपूर आणि एकदा श्री क्षेत्र भीमाशंकर येथे सायकलने प्रवास करून आपली जिद्द व चिकाटी दाखवून दिली आहे. सायकल चालविल्याने संपूर्ण शरीराचा व्यायाम होतो आणि आरोग्य चांगले राहते, असा त्यांचा अनुभव आहे.

या सायकलवारीसाठी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे तसेच उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील यांनी विठ्ठल ढोबळे यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## हस्तलिखित पेंटिंगला पुन्हा मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** ग्रामीण भागात लग्नसराईची लगबग आता जोरात सुरू झाली असून या पार्श्वभूमीवर पारंपारिक हस्तकलेला पुन्हा एकदा सुगीचे दिवस आले आहेत. विशेषतः लग्नसमारंभात वापरल्या जाणाऱ्या वधू-वरांच्या थर्माकोलमधील बदामांवरील हस्तलिखित नावांना आजही मोठी पसंती मिळत असल्याचे दिसून येत आहे.

आंबेगाव तालुक्यातील शिंगवे गावातील तरुण पेंटर विशाल दिनेश बंगाळ गेली तब्बल २५ वर्षे या पारंपारिक पेंटिंग व्यवसायाशी जोडलेले आहेत. बदलत्या काळानुसार संगणकाधारित फ्लेक्स व डिजिटल बॅनरचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला असला, तरी हस्ताक्षरातील सौंदर्य आणि पारंपारिक कलाकुसरीची मोहिनी अजूनही कायम असल्याचे ते सांगतात.



विशाल बंगाळ यांचा हा व्यवसाय वारशाने पुढे आला आहे. त्यांच्या वडिलांनी 'दिनेश आर्ट' या नावाने शिंगवे परिसरात साईनबोर्ड, बॅनर व विविध पेंटिंगची कामे अनेक वर्षे केली. मात्र, कालांतराने डिजिटल तंत्रज्ञानामुळे या व्यवसायाची मागणी कमी होत गेल्याने त्यांना व्यवसाय बंद करावा लागला. त्यानंतर विशाल यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत या कलेला पुन्हा उभारी देण्याचे काम सुरू केले.

सुंदर अक्षर, आकर्षक रचना आणि देखणी पेंटिंग ही विशाल बंगाळ यांची ओळख बनली आहे. सध्या लग्नसराईच्या हंगामामुळे वधू-वरांची नावे थर्माकोलच्या बदामांवर हाताने लिहिण्याचे काम वेगात सुरू आहे. पाबळ, निमगाव सावा, जुन्नर, खेड, नारायणगाव, मंचर आदी भागांत हे रंगवलेले बदाम पाठवले जात आहेत. विशेष म्हणजे, अनेक वर्षांपासून लग्नसमारंभात अशा हस्तलिखित बदामांनाच प्राधान्य दिले जात असल्याचे दिसून येते.

दरम्यान, पारंपारिक लेटरिंग व पेंटिंग करणारे कारागीर आता कमी होत चालले असून नव्या पिढीचा या व्यवसायाकडे ओढा नसल्याची खंत व्यक्त होत आहे. या पारंपारिक कलेचे जतन व्हावे, यासाठी तरुणांनी पुढे येणे गरजेचे असल्याचे मत विशाल बंगाळ यांनी व्यक्त केले.

## चाकण बाजारात पालेभाज्यांचे भाव गडगडले; एकूण उलाढाल ५ कोटी ९० लाख रुपये

# हिरवी मिरची, गाजर, कांदा व लसणाची प्रचंड आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये हिरवी मिरची, गाजर, कांदा, लसूण व दोडक्याची भरपूर आवक झाली. फळभाज्यांसह पालेभाज्यांची उच्चांकी आवक होऊनही भाव तेजीत राहिले. एकूण उलाढाल ५ कोटी ९० लाख रुपये झाली.
चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ४ हजार २५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ५०० ते १,००० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,३०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाला १० हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३५८ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.
शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा – एकूण आवक ४,२५० क्विंटल. भाव क्रमांक १ : १,००० रुपये, भाव क्रमांक २ : ८०० रुपये, भाव क्रमांक ३ : ५०० रुपये. बटाटा – एकूण आवक १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १ : १,३०० रुपये, भाव क्रमांक २ : १,००० रुपये, भाव क्रमांक ३ : ५०० रुपये. फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक (क्विंटलमध्ये) व प्रती १० किलोसाठी मिळालेले भाव कंसात पुढीलप्रमाणे – टोमॅटो – ३१६ क्विंटल (१,००० ते १,८०० रु.), कोबी – २२० क्विंटल (४०० ते ६०० रु.), फ्लॉवर – १९५ क्विंटल (६०० ते १,००० रु.), वांगी – ८९ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), भेंडी – ८६ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), दोडका – ५८ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), कारली – ६८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दुधी भोपळा – ४८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी – ९५ क्विंटल (१,००० ते १,६०० रु.), फरशी – २६ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), वालवड – ४० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), ढोबळी मिरची – १४४ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी – ४४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वाटाणा – २० क्विंटल (८,००० ते १०,००० रु.), शेवगा – ४८ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गाजर – १०० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), गवार – ५० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), आले – १५० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), ओली भुईमूग शेंग – ३५ पोती (३,५०० ते ४,५०० रुपये). पालेभाज्या : चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक (जुड्यांमध्ये) व मिळालेले भाव पुढीलप्रमाणे – मेथी – ६,१८० जुड्या (१,५०० ते २,५०० रुपये), कोथिंबीर – १३,७९० जुड्या (१,००० ते २,००० रुपये), शेपू – १,९४० जुड्या (१,००० ते १,५०० रुपये), पालक – ३,५४० जुड्या (५०० ते ८०० रुपये).

## बारामतीत ईव्हीएम–व्हीव्हीपॅट यंत्रे स्ट्रॉँग रूममध्ये जमा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत २३ एप्रिल रोजी ४७८ मतदान केंद्रांवर वापरण्यात आलेली ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रे बारामती एमआयडीसी येथील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात सुरक्षितपणे ठेवण्यात आली आहेत.

ही प्रक्रिया निवडणूक निरीक्षक, उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत छायाचित्रणासह पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली.

निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या साठवण व सुरक्षा प्रोटोकॉलनुसार स्ट्रॉँग रूमसाठी दुहेरी स्तराची सशस्त्र सुरक्षा तसेच २४ तास सीसीटीव्ही देखरेखीची व्यवस्था करण्यात आली आहे. राखीव ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रेदेखील त्याच ठिकाणी स्वतंत्र स्ट्रॉँग रूममध्ये सुरक्षा नियमांनुसार ठेवण्यात आली आहेत.

सर्व उमेदवारांना त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्रॉँग रूमच्या सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त करण्याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना अंतर्गत सुरक्षा परिघाबाहेर थांबण्याची परवानगी देण्यात आली असून, त्यासाठी सीसीटीव्ही प्रदर्शनाची व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### रस्ते अपघातात आई आणि मुलाचा मृत्यू

**सीतापूर (उत्तर प्रदेश):** इमालिया सुलतानपूर परिसरातील सीतापूर-गोला रस्त्यावर भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने आई-मुलासह तीन जणांचा मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. सीतापूरच्या आइलिया ब्लॉकमधील एका विवाह सोहळ्याला हजेरी लावून हिमांशू (३०), त्याची आई रेखा (५०) आणि सुनिता (४५) हे तिघे घरी परतत असताना त्यांच्या दुचाकीला ट्रकने धडक दिली, असे त्यांनी सांगितले.

### केरळमध्ये उष्णतेचा यलो अलर्ट जारी

**तिरुवनंतपुरम** : भारतीय हवामान विभागाने रविवारी केरळमधील अनेक जिल्ह्यांमध्ये दोन दिवसांसाठी उच्च तापमानाचा यलो अलर्ट जारी केला असून, राज्याच्या बहुतांश भागात उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा दिला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, रविवार आणि सोमवारी पालक्काड जिल्ह्यातील काही ठिकाणी कमाल तापमान सुमारे ४० अंश सेल्सिअस आणि कोल्लम जिल्ह्यात ३९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. पठाणमथिट्टा, कोट्टायम, त्रिशूर आणि कोझिकोड जिल्ह्यात तापमान ३८ अंश सेल्सिअस आणि अलप्पुझा, एर्नाकुलम, मलप्पुरम, कन्नूर आणि कासारगोड जिल्ह्यात ३७ अंश सेल्सिअसपर्यंत वाढू शकते, असे एका निवेदनात म्हटले आहे.

### झारखंड एटीएसकडून ३ जणांना अटक

**देवघर** : झारखंड दहशतवादविरोधी पथकाने देवघरमध्ये तीन जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून अमेरिकानिर्मित पिस्तूल जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. एका गुप्त माहितीच्या आधारे टाऊन पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली. या छाप्यात तीन जणांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून अमेरिकी बनावटीच्या एका पिस्तुलासह दोन पिस्तुले आणि सात काडतुसे जप्त करण्यात आली.

## केदारनाथमध्ये विक्रमी गर्दी, व्यवस्थापन सज्ज

# चारधाम यात्रेला दमदार सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**डेहराडून** : १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या चारधाम यात्रेला यंदा उत्साहपूर्ण आणि विक्रमी प्रतिसाद मिळत असून उत्तराखंडमधील पवित्र हिमालयीन तीर्थक्षेत्रांकडे भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ आणि बद्रीनाथ या चारही धामांमध्ये भाविकांची मोठी उपस्थिती दिसून येत असली तरी केदारनाथ हे मुख्य आकर्षण ठरत आहे.

बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीच्या आकडेवारीनुसार, रविवारी सकाळपर्यंत चारही धामांमध्ये मिळून अडीच लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले आहे. त्यापैकी केदारनाथ येथे सर्वाधिक १,३०,६३५ भाविकांनी भेट दिली असून बद्रीनाथ येथे ४१,०८५, यमुनोत्री येथे ३९,६४५ आणि गंगोत्री येथे ३९,२०५ भाविकांनी दर्शन घेतले आहे. विशेष म्हणजे, यात्रेसाठी आतापर्यंत २३ लाखांहून अधिक भाविकांनी नोंदणी केली आहे.



केदारनाथ मंदिराचे दरवाजे उघडल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच येथे भाविकांची मोठी गर्दी झाल्याने प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. मंदिर समिती व जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून दर्शन व्यवस्थापन सुरळीतपणे सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. प्रत्येक भाविकाला नियोजनबद्ध पद्धतीने दर्शन मिळावे यासाठी टोकन प्रणाली लागू करण्यात आली आहे. सोशल मीडियावर पसरत असलेल्या गैरव्यवस्थापनाच्या बातम्यांवर प्रशासनाने स्पष्ट भूमिका घेतली आहे. मंदिर समितीच्या अधिकाऱ्यांनी या अफवा निराधार असल्याचे सांगत, सध्या सर्व व्यवस्था व्यवस्थित सुरू असल्याचा दावा केला आहे. भाविकांना दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

या यात्रेत मोठ्या प्रमाणावर भाविक सहभागी होत असल्याने सुरक्षा, निवास आणि अन्नपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. सरकार, प्रशासन, मंदिर समित्या आणि स्थानिक नागरिक यांच्या समन्वयातून सर्व यंत्रणा कार्यरत असून पर्वतीय भागातील कठीण भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन नियोजन केले जात आहे.

दरम्यान, वाढत्या गर्दीमुळे पुढील काही दिवसांत यात्रेकरूंची संख्या आणखी वाढण्याची शक्यता असून प्रशासन सतर्क आहे. भाविकांच्या सोयीसाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## बालोत्रा रिफायनरीतील आगीचे कारण स्पष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर** : राजस्थानातील बालोत्रा जिल्ह्यातील पाचपद्रा रिफायनरीमध्ये २० एप्रिल रोजी लागलेल्या भीषण आगीचे कारण अखेर स्पष्ट झाले असून, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने (एचपीसीएल) हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाल्याची पुष्टी केली आहे. व्हॅक्यूम रेसिड्यू एक्सचेंजरच्या इनलेट लाइनवरील प्रेशर गेज टॅपिंग पॉईंटमध्ये गळती झाल्याने ही आग लागल्याचे कंपनीने सांगितले.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील निवेदनातून कंपनीने या घटनेबाबत सुरू असलेल्या अटकळांना पूर्णविराम दिला. तसेच प्रकल्पाच्या कामकाजावर मोठा परिणाम होणार नसल्याचेही स्पष्ट करत कामे बहुतांशी नियोजनानुसार सुरू राहतील, असा विश्वास व्यक्त केला.

२१ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रिफायनरीचे उद्घाटन होणार होते. मात्र त्याच्या एक दिवस आधीच ही आग लागल्याने उद्घाटनाचा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला. या घटनेनंतर तांत्रिक बिघाड, घातपात किंवा आंतरराष्ट्रीय षडयंत्र अशा विविध शक्यतांवर चर्चा सुरू होती.

कंपनीच्या सखोल तपासणीत आग हीट एक्सचेंजर स्टॅकपुरतीच मर्यादित राहिल्याचे समोर आले. या घटनेत सहा एक्सचेंजर आणि काही संबंधित उपकरणांचे नुकसान झाले असून इतर कोणत्याही सहाय्यक युनिट्सवर परिणाम झालेला नाही. उर्वरित युनिट्सचे कमिशनिंग काम नियोजनानुसार सुरू असल्याचे एचपीसीएलने स्पष्ट केले.

नुकसानीचा आढावा घेतल्यानंतर दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले असून ते पुढील तीन ते चार आठवड्यांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. मे २०२६ च्या उत्तरार्धात क्रूड डिस्टिलेशन युनिट पुन्हा सुरू करण्याची तयारी करण्यात येत आहे. तसेच एलपीजी, पेट्रोल, डिझेल व नॅफ्था यांसारख्या उत्पादनांचे चाचणी उत्पादन मे महिन्यात सुरू होण्याची शक्यता आहे.

## बंगालमध्ये मतदारांना धमकावले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यापूर्वी डायमंड हार्बर मतदारसंघात दुचाकीस्वारांकडून स्थानिकांना धमकावल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आल्यानंतर निवडणूक आयोगाने रविवारी चौकशीचे आदेश दिले आहेत.

प्रकरण समोर येताच निवडणूक आयोगाने डायमंड हार्बर पोलीस ठाण्यात औपचारिक तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. "या धमक्यांना आळा घालण्यासाठी




निवडणूक आयोग या प्रकरणावर लक्ष ठेवून आहे," अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, भारतीय न्याय संहितेतील (बीएनएस) गुन्हेगारी धमकी व बेकायदेशीर कृत्यांशी संबंधित कलमांखाली रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, २९ एप्रिल रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचा प्रचार सोमवारी सायंकाळी संपणार आहे. या पार्श्वभूमीवर ही घटना घडल्याने निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. यापूर्वीच निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्य सरकारने डायमंड हार्बर पोलीस जिल्ह्यातील पाच अधिकाऱ्यांना कथित गंभीर गैरवर्तन व तटस्थता न राखल्याबद्दल निलंबित केले होते. या पार्श्वभूमीवर घडलेल्या या घटनेमुळे प्रशासनाची कसोटी लागणार असल्याचे मानले जात आहे.

## कर्नाटक नेतृत्वाबाबत हायकमांडचा निर्णय मान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळूरू** : कर्नाटकच्या नेतृत्वाबाबत काँग्रेस हायकमांड जो काही निर्णय घेईल, त्याचा आपण आणि मुख्यमंत्री सिद्धरामय्या दोघेही आदर करून पालन करू, अशी स्पष्ट भूमिका उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी रविवारी मांडली. नवी दिल्ली दौऱ्यानंतर बंगळूरूत पत्रकारांशी बोलताना त्यांनी पक्षाचे केंद्रीय नेतृत्व योग्य वेळी योग्य निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त केला.

४ मेनंतर संभाव्य नेतृत्वबदल किंवा मंत्रिमंडळात फेरबदल होण्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा



सुरू असताना शिवकुमार यांचे हे विधान महत्त्वाचे मानले जात आहे. या दिवशी चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील निवडणुकांचे निकाल जाहीर होणार असून कर्नाटकातील दोन विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकांचे निकालही स्पष्ट होणार आहेत.

नवी दिल्लीतील दोन दिवसांच्या दौऱ्यात हायकमांडसोबत झालेल्या चर्चेबाबत विचारले असता, शिवकुमार यांनी तपशील देण्यास नकार दिला. "योग्य वेळी सर्व काही समजेल," असे सांगत त्यांनी अधिक भाष्य टाळले. ज्येष्ठ मंत्री सतीश जारकीहोळी यांच्या कथित वक्तव्यांबाबत विचारले असता, पक्षात कोणतेही मतभेद नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "पक्ष एकसंध आहे. हायकमांड जे ठरवेल, त्यानुसारच पुढील कार्यवाही होईल," असे ते म्हणाले.

२०२३ मध्ये सरकार स्थापनेवेळी कथित सत्तावाटप कराराच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बदलाच्या चर्चांवरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. "या विषयावर मी कधीही चर्चा केलेली नाही. हायकमांड जे ठरवेल ते आम्ही स्वीकारू," असे त्यांनी पुन्हा अधोरेखित केले. अनुसूचित जातींसाठीच्या सुधारित अंतर्गत आरक्षण धोरणावर भाजपने केलेल्या टीकेलाही त्यांनी प्रत्युत्तर दिले. "आम्ही दिलेले आश्वासन पूर्ण केले असून सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे," असे ते म्हणाले.

दरम्यान, वाढदिवसानिमित्त सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्स, बॅनर लावू नयेत, असा कडक इशारा त्यांनी समर्थकांना दिला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## त्या सात खासदारांच्या अपात्रतेची आपची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आम आदमी पक्षाचे ज्येष्ठ नेते व राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी रविवारी राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे औपचारिक याचिका सादर करत पक्ष सोडून भारतीय जनता पक्षात दाखल झालेल्या सात खासदारांना अपात्र ठरवण्याची मागणी केली. या सदस्यांचे पक्षांतर हे पक्षांतरबंदी कायद्याचे उल्लंघन असल्याचा दावा त्यांनी पत्रकार परिषदेत केला.

शुक्रवारी राघव चड्ढा, अशोक मित्तल, संदीप पाठक, हरभजन सिंग, राजेंद्र गुप्ता, विक्रम साहनी आणि स्वाती मालीवाल यांनी आम आदमी पक्षाचा राजीनामा देत भाजपमध्ये विलीन होण्याची घोषणा केली होती. या घडामोडीमुळे पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. पक्षांतर करणाऱ्या सदस्यांनी, अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्ष आपल्या मूळ तत्त्वांपासून भरकटल्याचा आरोप केला आहे. राज्यसभेत आम आदमी पक्षाकडे एकूण १० जागा असून सात सदस्यांच्या या गटामुळे दोन-तृतीयांश बहुमताचा मुद्दा पुढे आला आहे. राघव चड्ढा यांनी घटनात्मक तरतुदींचा हवाला देत, दोन-तृतीयांश सदस्यांनी दुसऱ्या पक्षात विलीन होण्यास अपात्रतेतून सूट मिळते, असा दावा केला आहे. मात्र, संजय सिंह यांनी या भूमिकेला विरोध दर्शवला. त्यांनी सांगितले की, पक्षाने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल व इतर घटनातज्ज्ञांशी सल्लामसलत केली असून त्यांच्या मते संबंधित खासदार अपात्रतेस पात्र ठरतात.

संजय सिंह यांनी या पक्षांतराला जनादेशाचा विश्वासघात असे संबोधले. विशेषतः पंजाबमधील जनतेशी विश्वासघात झाल्याचा आरोप त्यांनी केला, कारण पक्ष सोडणाऱ्या सात सदस्यांपैकी सहा सदस्य त्या राज्याचे प्रतिनिधित्व करतात.

## बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यापूर्वी उच्चस्तरीय बैठक

# निवडणूक तयारीचा आढावा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या पार्श्वभूमीवर तयारीचा आढावा घेण्यासाठी रविवारी कोलकात्यात उच्चस्तरीय समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत निवडणूक अधिकारी, पोलीस अधिकारी आणि केंद्रीय दलांचे कमांडर सहभागी होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही माहिती विश्वसनीय वृत्तसंस्थांच्या हवाल्याने समोर आली आहे.

धना धन्य सभागृहात होणारी ही बैठक २९ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाच्या तीन दिवस आधी आयोजित करण्यात आली आहे. "कोलकाता अंतर्गत निवडणूक जिल्ह्यांमधील एकूण तयारीचा आढावा घेऊन मतदान प्रक्रियेत सहभागी सर्व यंत्रणांमध्ये सुरळीत समन्वय साधणे हा बैठकीचा उद्देश आहे," असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

या बैठकीला कोलकाता पोलीस आयुक्त, कोलकाता उत्तर, कोलकाता दक्षिण आणि दक्षिण २४ परगणा जिल्ह्यांचे निवडणूक अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसेच निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले सामान्य, पोलीस आणि खर्च निरीक्षकही बैठकीत सहभागी होणार आहेत. याशिवाय, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांचे (सीएपीएफ) कंपनी कमांडर आणि संबंधित मतदारसंघांचे निवडणूक अधिकारीही उपस्थित राहण्याची शक्यता आहे. "सुरक्षा दलांची तैनाती, संवेदनशील भागांचे मूल्यांकन, नागरी व पोलीस प्रशासनातील समन्वय आणि मतदान कर्मचाऱ्यांची अंतिम तयारी यावर विशेष भर दिला जाणार आहे," असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, २३ एप्रिल रोजी पार पडलेल्या पहिल्या टप्प्यात १६ जिल्ह्यांतील १५२ मतदारसंघांमध्ये ९३ टक्क्यांहून अधिक मतदान झाले होते. या पार्श्वभूमीवर दुसऱ्या टप्प्याच्या तयारीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मुक्त, निष्पक्ष आणि शांततापूर्ण निवडणुका पार पडाव्यात यासाठी निवडणूक आयोग राज्यभर अशा प्रकारच्या आढावा बैठका घेत असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

## न्यायाधीश कधीच खऱ्या अर्थाने निवृत्त होत नाहीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर** : न्यायपालिकेच्या स्वातंत्र्य आणि निष्पक्षतेवर सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायाधीशपद ही आजीवन जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. "न्यायाधीश या भूमिकेतून कोणीही खऱ्या अर्थाने कधीच निवृत्त होत नाही," असे ते म्हणाले.

राजस्थान राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे आयोजित 'निवृत्तीनंतरचे न्यायपीठ' या परिषदेत ते बोलत होते. माजी न्यायाधीशांची तुलना त्यांनी प्राचीन पायऱ्यांच्या



विहिरींशी करत, ते अनुभव आणि शहाणपणाचे मोठे भांडार असल्याचे सांगितले. "अडचणीच्या काळात समाजाने आणि न्यायव्यवस्थेने या अनुभवाचा उपयोग करून घ्यावा," असे त्यांनी नमूद केले.

न्यायव्यवस्थेसमोर गुंतागुंतीची प्रकरणे उभी राहिल्यास अनुभवी माजी न्यायाधीशांकडून मार्गदर्शन घेणे आवश्यक असल्यावर त्यांनी भर दिला. "एक सुज्ञ न्यायपालिका अनुभवाचा केवळ आदर करत नाही, तर योग्य वेळी त्याचा उपयोग करून बळकट होते," असेही त्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी कवी दुष्यंत कुमार यांच्या ओळींचा संदर्भ देत न्यायाधीशांना जनतेचा विश्वास जपण्याचे आवाहन केले. "तुम्ही केवळ व्यक्ती नसून एक संपूर्ण विधान आहात," असे सांगत न्यायाधीशांनी आपल्या भूमिकेची जाणीव ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले. या परिषदेला विविध उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालयातील माजी न्यायाधीश उपस्थित होते. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली.

मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी आपल्या भाषणात न्यायपालिकेचे महत्त्व अधोरेखित करत, "न्यायपालिका ही संविधानाची संरक्षक असून प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळवून देण्याचे काम करते. न्यायाधीश हे न्यायाच्या शोधात असलेल्या नागरिकांसाठी आशेचे प्रतीक आहेत," असे सांगितले.

### नेत्यांनी बजावला मतदानाचा हक्क

**अहमदाबाद** : गुजरातमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रविवारी सकाळपासून मतदानास सुरुवात झाली असून मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनीही आपला मतदानाचा हक्क बजावला. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकांकडे विशेष लक्ष लागले आहे.

## दिल्ली विमानतळावर विमानात आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नवी दिल्लीहून झुरिचकडे जाणाऱ्या स्विस इंटरनॅशनल एअरलाइन्सच्या विमानात रविवारी पहाटे आग लागल्याने मोठी दुर्घटना टळली. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उड्डाणाआधीच ही घटना घडली असून सहा प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत.

फ्लाइट क्रमांक एलएक्स १४७ हे एअरबस ए ३३० विमान पहाटे १.०८ वाजता टर्मिनल ३ येथील रनवे १०/२८ वरून उड्डाणासाठी सज्ज होते. विमानात चार लहान मुलांसह एकूण २४५ प्रवासी आणि १३ कर्मचारी होते. उड्डाणासाठी वेग घेत असताना वैमानिकाला विमानाच्या मागील डाव्या चाकातून धूर येत असल्याचे दिसून आले. त्यानंतर तात्काळ उड्डाण रद्द करून आणीबाणी जाहीर करण्यात आली. अग्निशमन दल व रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

अग्निशमन दलाने आग नियंत्रणात आणली. प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी विमानाच्या पुढील व मागील दरवाजांवर आपत्कालीन स्लाईड्सचा वापर करण्यात आला. या बचावकार्यादरम्यान सहा प्रवासी गंभीर जखमी झाले. जे प्रवासी स्लाईड्स वापरू शकत नव्हते, त्यांच्यासाठी पायऱ्यांचीही व्यवस्था करण्यात आली होती. जखमींना तात्काळ गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेमुळे रनवे १०/२८ सुमारे ३० मिनिटांसाठी बंद ठेवण्यात आला होता.

## महागाई, रुपया आणि अर्थव्यवस्थेवर दबावाची शक्यता

# होर्मुझ तणावाचा भारतावर परिणाम: युनियन बँक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील सुरू असलेला संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव हे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मोठा धोका ठरत असल्याचा इशारा युनियन बँक ऑफ इंडियाच्या अहवालात देण्यात आला आहे. वाढलेल्या कच्च्या तेलाच्या किमतींमुळे महागाई, रुपया आणि चालू खात्यावर दबाव येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

'फ्रॉम होर्मुझ टू द रुपी: वॉर, ऑइल अँड द ग्लोबल रिप्रायसिंग ऑफ रिस्क' या अहवालात नमूद केले आहे की, होर्मुझ सामुद्रधुनीतील व्यत्यय



आणि ब्रेंट क्रूड तेलाचे दर १०० डॉलर प्रति बॅरलच्या वर गेल्याने जागतिक तसेच देशांतर्गत आर्थिक परिस्थितीवर नकारात्मक परिणाम होत आहे.

अहवालानुसार, तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईचा धोका कायम राहतो, मध्यवर्ती बँकेच्या धोरणातील शिथिलतेला विलंब होतो, चालू खात्यातील तूट वाढते आणि वित्तीय परिस्थिती अधिक कठीण बनते. ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशांवर याचा अधिक परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के आयात करतो. होर्मुझमधील पुरवठ्यातील व्यत्ययामुळे तेलाचे दर वाढून अर्थव्यवस्थेवर अप्रत्यक्ष 'ऊर्जा कर' पडल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर रुपया ९५ च्या जवळपास नीचांकी पातळीवर घसरल्याचेही अहवालात म्हटले आहे.

जागतिक स्तरावर मजबूत डॉलर, भांडवली बाहेर पडणे आणि वाढलेली भू-राजकीय अनिश्चितता यामुळे भारतीय रुपयावर दबाव कायम राहिला आहे. या परिस्थितीत भारतीय रिझर्व्ह बँकेने बाजार स्थिर ठेवण्यासाठी हस्तक्षेप करत तरलता उपाययोजना व परकीय चलन जोखमीवर नियंत्रण ठेवण्याचे पाऊल उचलले आहे. मौद्रिक धोरण समितीने रेपो दर ५.२५ टक्के कायम ठेवत तटस्थ भूमिका कायम ठेवली आहे. बाजारात अतिअस्थिरता निर्माण झाल्यास आवश्यक ती कारवाई करण्यास आरबीआय तयार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, सोने व ऊर्जा आयातीत घट झाल्यामुळे मार्च २०२६ मध्ये व्यापार तूट काही प्रमाणात कमी होऊन २०.७ अब्ज डॉलर्सवर आली आहे. तरीही धोके कायम असून, ब्रेंट क्रूड तेलाचे दर १०० ते ११० डॉलर दरम्यान राहिल्यास ग्राहक किंमत निर्देशांक ४ टक्क्यांपेक्षा वर जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

तेलाच्या किमतीत प्रति बॅरल १० डॉलर वाढ झाल्यास चालू खात्यातील तूट व महागाई दोन्ही वाढू शकतात, असा इशाराही अहवालात देण्यात आला आहे. पुढील काळात रुपया मर्यादित कक्षेत राहील, मात्र त्यात घसरणीचा कल कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पश्चिम आशियातील परिस्थिती, तेलाचे दर आणि जागतिक आर्थिक घडामोडी यांवर भारताच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहील, असा निष्कर्ष अहवालात काढण्यात आला आहे.